क्रमांक : १६८६५ /क-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १२ ऑगस्ट, २०२२

**संदर्भ** :- सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. वैतधो-२०२१/प्र.क्र.३७/आरोग्य-३, दि. २२ एप्रिल, २०२२

**:: परिपत्रक ::**

उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने या सचिवालयात कार्यरत असलेले वय वर्ष ४० ते ५० या वयोगटातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दोन वर्षातून एकदा व वय वर्ष ५१ व त्यावरील वयोगटातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना दरवर्षी वैद्यकीय तपासणी अनुज्ञेय राहील. वैद्यकिय तपासणीकरीता रु. ५०००/- याप्रमाणे इतक्या रकमेपर्यंतच्या खर्चाची प्रतिपूर्ती प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांना अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

वैद्यकिय तपासणी झाल्याची नोंद अधिकारी व कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालात करावयाची असल्याने सदर तपासण्या करण्याचा कालावधीची गणना आर्थिक वर्षाप्रमाणे (उदा.१ एप्रिल, २०२२ ते ३१ मार्च, २०२३) करण्यात यावी.

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मधील सर्व वैद्यकीय चाचण्या या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांचेकरिता विशेष सुट देऊन रु. ५०००/- मध्ये करुन देण्याची तयारी बॉम्बे रुग्णालय यांनी दर्शविली आहे.

या कालावधीत संबंधित रुग्णालयाशी परस्पर संपर्क साधून तपासणीच्या तारखा निश्चित करुन घ्याव्यात व प्रपत्र-अ मधील सर्व वैद्यकिय तपासण्या करुन घ्याव्यात. तसेच सदर चाचण्या करण्यांची वयोमर्यादा ४० वर्षे व त्यावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू असल्याने ज्यांचे ज्या आर्थिक वर्षात वय ४० वर्ष पूर्ण होते, त्या आर्थिक वर्षापासून सदर तपासण्या करण्याचा लाभ लागू/देय राहील.

वैद्यकिय तपासण्यांचा १ दिवस हा कालावधी कर्तव्यकाळ म्हणून समजण्यात येईल. तसेच तपासण्यांसाठीची पूर्वतयारी/आवश्यक खबरदारी सुध्दा रुग्णालयाच्या सल्ल्याने अधिकारी/कर्मचारी यांनी स्वत: घ्यावी.वैद्यकिय तपासणीसाठी मुख्यालय किंवा मुख्यालयाबाहेरील रुग्णालयात जाणार असल्याची पूर्वकल्पना अधिकाऱ्यांनी / कर्मचाऱ्यांनी, त्यांच्या लगतच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना देणे आवश्यक राहील.

सदर तपासण्या केल्यावर त्याचा अहवाल वैद्यकिय अधिकाऱ्याने उपलब्ध केल्यावर कार्यालयास तात्काळ सादर करावा.

आदेशानुसार

मोहन काकड

(मोहन काकड)

अवर सचिव,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय

२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव

३) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमडळ सचिवालय यांचे कार्यालय.

६) या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी.

७) निवडसूची